# प्रवाशांना गंडा घालणारी टोळी गजाआड

- लोहमार्ग पोलिसांची कामगिरी
- तिकीट कन्फर्म करून देण्याच्या बहाण्याने खेचत होते जाळ्यात

**पुणे: प्रतिनिधी**

रेल्वे तिकीट कन्फर्म करून देण्याच्या बहाण्याने प्रवाशांना आर्थिक गंडा घालणाऱ्या टोळीला लोहमार्ग पोलिसांनी जेरबंद केले आहे. चंदनकुमार श्रीरामबिलास साह (वय.२८), सुनील महेश साह (वय.२०, दोघेही राहणार बिहार) अशी अटक केलेल्यांची नावे असून, त्यांचे अन्य दोन साथीदार मात्र फरार झाले आहेत. याप्रकरणी रहमानअली हजरत अली (रा. विमाननगर) यांनी लोहमार्ग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

फिर्यादी हे २८ डिसेंबरला त्यांच्या मूळ गावी पश्चिम बंगालला जाण्यसाठी निघाले होते. ते रेल्वे प्रवासासाठी पुणे स्टेशन येथे आले असताना आरोपींनी त्यांना काढलेले जनरल तिकीट कन्फर्म करून देतो असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यांच्याकडील मोबाईल व एटीएम कार्ड काढून घेतले. त्याच एटीएमचा वापर करून त्यांच्या परस्पर खात्यातून ४४ हजार रुपये काढून घेतले.

वरिष्ठ निरीक्षक सुरेशसिंग गौड यांच्या मार्गदर्शनाखाली लोहमार्ग पोलिसांचे एक पथक स्टेशन परिसरात गस्तीवर असताना रेल्वे तिकीट कन्फर्म करून देण्याच्या बहाण्याने प्रवाशांची फसवणूक करणारी टोळी स्टेशन परिसरात असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता



**अटक आरोपीसह लोहमार्ग पोलिसांचे पथक.**

त्यांनी हा गुन्हा इतर दोन साथीदारांच्या मदतीने केला असल्याची कबुली दिली. ही कामगिरी लोहमार्ग पोलिस अधीक्षक दीपक साकोरे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक सुरेशसिंग गौड, सहाय्यक निरीक्षक काळे, कर्मचारी भीमा हगवणे, प्रशां डोईफोडे, दिनेश गवळी, चिंताकोटे केंद्रे, महिला कर्मचारी बेबी थोरा यांच्या पथकाने केली.

My Pune Edition
3 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

Scanned by CamScanner